स. फौजदारी खटला क्र. <u>**१४३/२०२४**</u>
कुलदिप विरूद्ध नंदकिशोर
**निशाणी १५ खाली**

**<u>फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ कुलदिप संतोषराव मंगळे याची उर्वरित सरतपासणी शपथेवर सुरू</u> — <u>फिर्यादी तर्फे ॲड श्री. जी. आर. पानझडे यांचे मार्फत.</u>**

मी आरोपीला ओळखतो. मी माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी १५ वरील मजकुर वाचला आहे. आरोपी माझा मित्र आहे. आरोपीसोबत माझा पैशांचा व्यवहार झाला होता. आरोपीला मी दवाखान्याच्याकामी पैसे रूपये एक लाख दिले होते. सदर पैसे परत करण्याच्या हेतुने आरोपीने मला भारतीय स्टेट बॅकेचा दि. १६/११/२०२३ रोजीचा धनादेश दिला होता. आरोपीने मला दिलेला वादातील मुळ धनादेश मी आजरोजी अभिलेखावर दाखल केला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सदर मुळ धनादेशाला **निशाणी १६** देण्यात येते. सदर धनादेश मी दि. १७/११/२०२३ रोजी वटवण्याकामी बॅकेत टाकला असता तो अनादरित झाला. त्याबाबत बॅकेने मला मेमोद्वारे कळवले होते. सदर मुळ मेमो मी अभिलेखावर दाखल केला आहे. त्यास **निशाणी १७** देण्यात येते. मी धनादेश अनादरित झाल्यामुळे आरोपीला पाठवलेल्या दि. २९/११/२०२३ रोजीच्या नोटीसीची स्थळप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर माझी सही आहे. सदर नोटीसीच्या स्थळप्रतीस **निशाणी १८** देण्यात येते. आरोपीला निशाणी १८ वरील नोटीस पाठवल्याबाबत मुळ पोस्टाची पावती मी अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **निशाणी १९** देण्यात येते. निशाणी १८ वरील मुळ नोटीस आरोपीला प्राप्त झाल्याबाबत पोस्टाची मुळ पोहच पावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावरील सही कोणाची आहे हे मला माहित नाही. सदर पोस्टाच्या पोहच पावतीस **आर्टिकल 'ए'** देण्यात येते. आरोपीने निशाणी १८ वरील नोटीस प्राप्त होवुन देखील मला धनादेशातील रक्कम परत केली नाही. त्यामुळे मी सदर केस दाखल केली आहे. **सरतपास पुर्ण**.

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲड. एम. पी. देव यांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपावेतो तहकुब.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**
(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.

दि. १८.०७.२०२५
अकोट

**RCC No. 143/2024**
**Evidence/Exh. 15**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file Evidence are same word to word as per the original evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. N. DURATKAR |
| Court Name | : | 2nd Joint Civil Judge (Jr.Dn.) & JMFC, Akot, Tq. Akot, Dist. Akola |
| Date of decision | : | 18/07/2025. |
| Evidence Signed by P.O on | : | 18/07/2025. |
| Evidence Uploaded on | : | 19/07/2025. |